जा.क्र/जिपही/कृषि/डॉ.बा.आ.कृ.स्वा.यो./कावि/ 587 /2019
कृषि विभाग,जिल्हा परिषद,हिंगोली
दिनांक:-१/08/2019

प्रति,
मा.जिल्हा माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय ,हिंगोली.

विषय:-डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत अनुसूचीत जाती/नवबौध्द अंर्तगत शेतकऱ्यानां कृषि विकासासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना सन.2019-20 मध्ये ऑनलाईन अर्ज दिनांक:- **05/08/2019 ते 04/09/2019** पर्यन्तं करण्याबाबात जाहीर प्रसिध्दी देणे बाबत.

संदर्भ:-संचालक(विस्तार व प्रशिक्षण),कृषि आयुक्तालय,पुणे यांचे पत्रक्र.जाक्र./विप्र-7/डॉ.बा.आ.कृ.स्वा.यो/मा. सु. /19-20/2228/2019 दिनांक:-18जुलै,2019.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रकान्वये अनुसूचीत जाती/नवबौध्द शेतकऱ्यांचे कृषि उत्पन्न/उत्पादन वाढीस साहाय्य करून त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मदत करणे व परिस्थीतीची गरज चिरात घेऊन जमिनीतला ओलावा टिकवून ठेवण्याच्या दृष्टीकोनातुन सध्याची प्रचलीत विशेष घटक योजना,डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना बदलेलेल्या निकषानुसार सन.2016-17 पासुन राबविण्यात येत आहे.सदर योजना सन.2019-20 या वित्तीय वर्षामध्ये पुढील प्रमाणे राबविण्यात येईल.

**डॉ.बाबसाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना (सन.2019-20)**

सदर योजने मध्ये सन.2019-20या वर्षात खालील घटकासाठी त्यापुढे नमुद रक्कमेच्या मर्यादेत अनुदान देय राहील.

| अक्र | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| 1 | नविन विहीर | 250000/-(दोन लक्ष पन्नास हजार) |
| 2 | जुनि विहीर दुरूस्ती | 50000/- |
| 3 | इनवेल बोअरींग | 20000/- |
| 4 | पंप संच | 20000/-(10 आश्वशक्ती क्षमतेचे विद्युत पंप सुच करिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियाना अंतर्गत मंजूर असलेल्या मापदंडानुसार 100% अनुदान देय राहील. |
| 5 | विज जोडणी आकार | 10000/- |
| 6 | शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | 100000/- |
| 7 | सुक्ष्म सिंचन<br>अ)ठिबक सिंचन<br>ब)तुषार सिंचन | <br>50000/-<br>25000/- |

उपरोक्त सात बाबीचा लाभ हा तिन पॅकेजस्वरूपात द्यावयाचा आहे.ते पॅकेज खालील प्रमाणे .

1) **नविन विहीर पॅकेज-**

नविन विहीर ,पंपसंच,वीजजोडणी आकार,सुक्ष्म सिंचनसंच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग.

2) **जुनि विहीर दुरूस्ती पॅकेज-**

जुनि विहीर दुरूस्ती ,पंपसंच,वीजजोडणी आकार,सुक्ष्म सिंचनसंच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग.

3) **शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज-**

शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण ,पंपसंच,वीजजोडणी आकार,सुक्ष्म सिंचनसंच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग.(मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत शेततळयाचे काम पुर्ण केलेले आहे त्याच शेतक-याना या पॅकेजचा लाभ घेता येईल)

4)ज्या शेतक-यांनी यापुर्वी शासकिय योजनेतुन विहीर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहीर बांधली असेल अशा

जिल्हा सुचना/विज्ञा अधिकारी हिंगोली

Scanned by CamScanner

शेतक-यांना पंपसंच,वीजजोडणी आकार व सुक्ष्म सिंचन बसविण्यासाठी अनुदान देय राहील.

5) सोलार पंपांसाठी अनुदानः-जर शेतकऱ्यास महावितरण कंपनी कडून सोलार पंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीज जोडणीसाठी अनुदानाच्या मर्यादेत(30000रू)लाभार्थी हिस्स्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

6)वरील घटकांपैकी लाभार्थ्याकडे काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ घेण्यासाठी खालील आवश्यक घटक निवड करावी,जर लाभार्थी योजनेस पात्र असल्यास.

**1)पंपसंच 2) विज जोडणी आकार 3)सुक्ष्म सिंचन संच(ठिबक/तुषार)**

## -: लाभार्थी पात्रतेच्या अटीः-

1) लाभार्थी हा अनुसूचीत जाती / नवबौध्द शेतकरी असला पाहिजे.

2) शेतक-याकडे सक्षम प्रधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

3) शेतक-याच्या स्वताःच्या नावे कमीत कमी **0.40 हेक्टर क्षेत्र व कमाल 6.00** हेक्टर एवढी शेतजमिन लाभार्थीच्या नावे असली पाहिजे.(सामुहीक शेत जमिन किमान 0.40हे धारण करणारे एकत्रीत कुटूबं लाभ घेण्यासाठी पात्र आहे.)

4)ज्या शेतकऱ्यांना नविन विहीर या व्यतिरीक्त इतर घटकांचा लाभ घ्यावयाचा आहे त्यानां किमान शेत जमिन0.20आर असणे आवश्यक आहे.

5) शेतक-याचे नावे जमिन धारणेचा 7/12 दाखला व 8 अ उतारा असणे आवश्यक आहे.

6) लाभार्थ्याचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

7) लाभार्थ्याचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधार कार्डाशी संलग्न असणे आवश्यक आहे.

8) अनुसूचीत जाती / नवबौध्द शेतक-यांचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न **रु.150000/-** पेक्षा जास्त नसावे (तहसीलदार यांचा सन.2018-19 चा उत्पन्नाचा दाखला आवश्यक).

9) स्वर्गीय कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना ने अर्तगत जमिन वाटप झालेल्या शेतकऱ्यांना योजनेचा प्रधान्याने लाभ देण्यात यावा.

### अर्ज करण्याची पध्दतः-

1) या योजने अंर्तगत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.सदर सुविधा दिनांकः-05/08/2019 पासुन ते 04/09/2019दिनांका पर्यन्त ऑनलाईन अर्ज www.agriwell.mahaonline.gov.in.या संकेतस्थळावर दाखल करावा.

2) ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत आवयशक त्या कागदपत्राच्या स्वयंसांक्षाकीत ,छायांकित प्रतींसह अर्जाची /परिपुर्ण प्रस्तावाची मुळप्रत शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रासह कृषि अधिकारी(विघयो),पंचायत समिती यांचे कडे स्वःहस्ते सादर करावा.अर्जाची लेखी पोहच घ्यावी .

sd/-

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद हिंगोली.**

प्रतिलीपी

1) मा.जिल्हाधिकारी,हिंगोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

2) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी ,हिंगोली यांना देवून विनंती की सदरील योजनेची प्रसिध्दी हिंगोली जिल्हाच्या वेबसाईडवर करण्यात यावी.

3) सहाय्यक आयुक्त ,समाज कल्याण,हिंगोली यानां माहितीस्तव.

4) गट विकास अधिकारी पंचायत समिती,हिंगोली/कळमनुरी/वसमत/सेनगाव/औंढा(ना)यांना देवुन सुचीत करण्यात येते की,त्यांनी आपल्यास्तरावर तालूक्यातील ग्रामसेवका मार्फत सर्व गावामध्ये ग्रामसभेव्दारे प्रसिध्दी द्यावी तसेच आपल्या स्तरावर पंचायत समितीच्या सर्व सन्मानणीय सदस्यांना सदरील योजनेची माहिती देण्यात यावी. तत्पाश्च्यात प्राप्त प्रस्तावाची नियमीत वेळीच छाननी पुर्ण करून परीपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत. उशीरा सादर केलेल्या अर्जाची विचार केला जाणार नाही.

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद हिंगोली.**

Scanned by CamScanner